(29)

महाराष्ट्र शासन

क्रमांक - संकिर्ण - २०१९/प्र.क्र.२०३/कोषा(प्रशा-३)
वित्त विभाग, मादाम कामा मार्ग
हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२
दि.२२/१०/२०२०.

प्रति,

संचालक,
संचालनालय लेखा व कोषागारे,
मुंबई.

**विषय** — अधिसंख्य पदावर वर्ग करण्यात आलेल्या अधिकारी / कर्मचा-यांच्या सेवा विषयक बाबींबाबत.

**संदर्भ** — संचालनालयाचे पत्र क्र.संलेको २०२०/प्रशा.कोषा/ कार्या.८/अधि.पद.-सेवा बाबी/ ६३१/२०७४, दि.०२.०९.२०२०.

महोदय,

उपरोक्त विषयाच्या संदर्भाधीन पत्रामध्ये उपस्थित केलेल्या मुद्यांबाबत सामान्य प्रशासन विभागाच्या अभिप्रायास अनुसरुन आपणांस कळविण्यात येते की,

दिनांक २१ डिसेंबर २०१९ च्या, सा.प्र.वि. शासन निर्णयातील तरतूदीनुसार अधिसंख्य पदावर दर्शविण्यात आलेल्या अधिकारी व कर्मचा-यांना सेवाविषयक व सेवा निवृत्ती-विषयक कोणकोणते लाभ अनुज्ञेय ठरतील याबाबत शासनास शिफारसी करण्यासाठी दि.१५ जून, २०२० च्या शासन निर्णयान्वये मा.मंत्री, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण यांच्या अध्यक्षतेखाली एक अभ्यासगट स्थापन करण्यात आलेला आहे. या अभ्यास गटाच्या शिफारसी शासनास प्राप्त झाल्यानंतर अशा अधिकारी व कर्मचा-यांना द्यावयाच्या सेवा विषयक व सेवा निवृत्ती विषयक लाभांबाबत सामान्य प्रशासन विभागाकडून निर्णय घेण्यात येईल. तोपर्यंत अशा अधिकारी व कर्मचा-यांना सेवाविषयक कोणतेही लाभ सद्यःस्थितीत देता येणार नाहीत. तसेच अधिसंख्य पदावर ११ महिन्यांचा कालावधी संबंधित कर्मचारी अधिसंख्य पदावर रुजू झाल्याच्या तारखेपासून सुरु करण्यात यावा. अशा अधिकारी व कर्मचा-यांच्या सेवापुस्तकाबाबतही अभ्यासगटाच्या शिफारसी प्राप्त झाल्यानंतरच निर्णय घेण्यात येईल.

(स्वाक्षरी)

2020-10-26 12:01